# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२७१६**

**अपिलार्थी श्री. संदीप चतुर्भज सुतार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.विद्युत निरीक्षक (उद्वाहन)**
विद्युत निरीक्षक (सचिव व अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक),
उद्योग, ऊर्जा व खनिकर्म विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,
आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विद्युत निरीक्षक**
विद्युत निरीक्षक (सचिव व अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक),
उद्योग, ऊर्जा व खनिकर्म विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला,
आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०४.२०२४ | ०४.०४.२०२४, १३.०५.२०२४ | ०८.०५.२०२४ | ११.०६.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०२.०९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०४.०४.२०२४, दि.१३.०५.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ११.०६.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. ०२.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार १) बार्शी शहरातील डॉ संजय अंधारे यांच्या सुश्रुत हॉस्पिटल, अलिपुर रोड, बार्शी यांनी उद्‌वाहन (लिफ्ट) बाबत आपल्या कार्यालयास मान्यता प्राप्त करणे साठी प्रस्ताव सादर केला असल्यास सदरील प्रस्तावची छायांकित प्रती उपलब्ध करून मिळावेत. २) बार्शी शहरातील डॉ संजय अंधारे यांच्या सुश्रुत हॉस्पिटल, अलिपुर रोड, बार्शी यांच्या कडून वरील नमूद कालावधी मधील आपल्या कार्यालयास प्राप्त झालेला सर्व पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती उपलब्ध करून मिळावेत. ३) नमूद कालावधी मध्ये आपल्या कार्यालयाने सुश्रुत होस्पिटलच्या लिफ्ट बाबत तपासणी केली असल्यास त्या बाबतची सर्व कागदपत्रे छायांकित प्रतीत मिळवीत. ४) सदरील माहिती आपल्या कार्यालयास उपलब्ध नसल्यास संबंधित कार्यालयास माहिती अधिकार अर्ज वर्ग करून माहिती उपलब्ध करून देण्याबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, विद्युत निरीक्षण विभाग, सोलापूर यांनी जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरीक्षक, सचिव अनुज्ञापक मंडळ व उदवाहन विभाग, चेंबूर यांना दि. ०४.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, माहितीचा अधिकार

..२/-

अधिनियम २००५ चे कलम ६ अंतर्गत माहिती मिळणे बाबतचा श्री संदीप चतुर्भुज सुतार मो.क्र. ६३०००0१२६२), बी-४ लक्ष्मीबाई जगदाळे हाऊसिंग सोसायटी, फुले प्लॉट, उपलाई रोड बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर पिन कोड-४१३४११ यांचा अर्ज दिनांक ०२.०४.२०२४ संदर्भाधिन पत्रान्वये या कार्यालयास दिनांक ०३.०४.२०२४ रोजी रजिस्टर पोस्टाने प्राप्त झाला आहे. सदर अर्जामधील नमुद विषयाबाबत पडताळणी केली असता अर्जातील विषय आपल्या कार्यालयाशी संबंधीत आहे. सबब सदर अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) (दोन) नुसार आपल्या कार्यालयास हस्तांतरित करण्यात येत आहे. त्यांची प्रत अपिलार्थींना देण्यात आली. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विद्युत निरीक्षक सचिव अनुज्ञापक मंडळ व उदवाहन विभाग, चेंबूर यांनी अपिलार्थींना दि. १३.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणे बाबतचा आपला अर्ज दि.१५.०४.२०२४ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जामधील विषयाची पडताळणी केली असता, सदर अर्जामधील नमूद विषयान्वये कार्यालयीन अभिलेखाची तपासणी केली असता का कार्यालयामार्फत निर्गमित केलेली उद्धबान परवानगी त्यांना देण्यात येणाऱ्या क्रमांकाच्या आधारे जतन करण्यात येतात. त्यामुळे आपण दिलेल्या माहितीच्या आधारे मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०८.०५.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०६.२०२४ रोजी अपिलार्थी यांनी दिनांक माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागितलेली माहिती प्रतिवादी यांनी पत्र क्र. विनि(सममंवउनि)/मु.ली./६१५/२०२४ अन्वये दिल्याचे स्पष्ट होते. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य देण्यात यावी असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांचे दि. ११.१२.२०२५ रोजीचे लेखी निवेदन ईमेलद्वारे आयोगास सादर केले ते अभिलेखावर घेण्यात आले.

४. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या उदवाहन परवानगी जतन करण्यात येतात. संबंधित आस्थापनाच्या नावावरुन सदर माहिती शोधणे शक्य नाही.

५. जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयातील अभिलेख पुन्हा तपासून अपिलार्थी यांना हव्या असलेल्या माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.१२.२०२५ रोजी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

सत्यमेव जयते

(signature) 12-12-2025

**मुंबई**
**दिनांक : १२.१२.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**